
# Prize Distribution 2024



प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

## संक्षिप्त



सोलापूर : व्ही. जी. शिवदारे कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटन प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते केले.

## 'नवीन शैक्षणिक धोरणामुळे विकास शक्य'

**सोलापूर :** नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य आहे. हे धोरण विद्यार्थ्यांनी समजून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले. दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही.जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या १६ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर दक्षिण सोलापूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, प्रा. भीमाशंकर शेटे, डॉ. सिद्धेश्वर वाले, अण्णासाहेब कोतली, डॉ. दत्तात्रय सुत्रावे, एम. बी. पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शुभदा उपासे व प्रा. हरीप्रिया यांनी केले. डॉ. ऋषिकेश धनवे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य – डॉ. दामा



**सोलापूर / प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य असून हे धोरण विद्यार्थ्यांनी समजून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले. व्ही.जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या १६ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे, डॉ. सिद्धेश्वर वाले, अण्णासाहेब कोतली, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय सुत्रावे, उपप्राचार्य एम.बी. पाटील उपस्थित होते. या पारितोषिक वितरण समारंभात ६ प्राध्यापक व १९२ विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. तसेच प्रांजल पवार या विद्यार्थिनीस 'व्ही.जी.एस. स्टार' हा किताब देण्यात आला.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. दत्तात्रय सुत्रावे, सुभाष मुनाळे, पशुपती माशाळ, प्रा.डॉ. अनमोल वळसंगे, प्रमोद बिराजदार, भीमाशंकर म्हेत्रे, चंद्रकांत गुरव, सिद्धाराम हेळकर, डॉ. बी.एन.कांबळे, डॉ. आर.वाय. पाटील, डॉ. कापसे, प्राचार्या श्रुती गायकवाड, प्रा. एम.बी. पाटील, अंजली तिवारी, मुख्याध्यापिका पूजा बाजपेयी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शुभदा उपासे-शिवपूजे व प्रा. हरीप्रिया यांनी केले. डॉ. ऋषिकेश धनवे यांनी आभार मानले.

Smart Solapur Edition

सुराज्य
सोलापूर
epaper.surajyadigital.com
21 Mar 2024 - Page 8

# नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांसाठी उत्तम

## प्र. कुलगुरू दामा: शिवदारे महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ

सोलापूर/प्रतिनिधी

नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य असून हे धोरण विद्यार्थ्यांनी समजून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले.



सोलापूर : शिवदारे महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी उपस्थित मान्यवर.

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही.जी.शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्सच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. व्यासपीठावर दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, विश्वस्त प्रा. भिमाशंकर शेटे, डॉ. सिद्धेश्वर वाले, अण्णासाहेब कोतली, प्राचार्य डॉ.दत्तात्रय सुत्रावे, उपप्राचार्य एम. बी. पाटील उपस्थित होते.विद्यापीठामध्ये भ्रष्टाचार मुक्त कामकाज करून आणखी पुढे आणण्याचा प्रयत्न आहे. प्राध्यापकांना सीड मनी, विद्यार्थ्यांना एन. सी. सी वगैरे सुविधा देण्याचा प्रयत्न नवीन वर्षात करीत असल्याचेही दामा यांनी सांगितले. राजशेखर शिवदारे यांनी डॉ. दामा यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच सर्व पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमात ६ प्राध्यापक व १९२ विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रांजल पवार हिस व्ही.जी.एस.स्टार हा किताब देण्यात आला. विजयालक्ष्मी जेऊरगी हिच्या स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्य सुत्रावे यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर केला. प्रमुख अतिथींचा परिचय प्रा.डॉ. अनमोल वळसंगे यांनी करून दिला. पुरस्कारांचे यादी वाचन समन्वयक प्रा.एम.बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शुभदा उपासे-शिवपूजे व प्रा. हरीप्रिया यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. ऋषिकेश धनवे यांनी केले. याप्रसंगी सुभाष मुनाळे, पशुपती माशाळ, प्रमोद बिराजदार, भिमाशंकर म्हेत्रे, चंद्रकांत गुरव, सिद्धाराम हेळकर, डॉ.बी.एन.कांबळे, डॉ.आर.वाय.पाटील, डॉ.कापसे, प्राचार्या श्रुती गायकवाड, अंजली तिवारी, मुख्याध्यापक पूजा बाजपेयी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



# नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

## शिवदारे महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण

संचार प्रतिनिधी

सोलापूर, दि. २०- नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य असून हे धोरण विद्यार्थ्यांनी समजून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले.



दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या १६ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे, डॉ. सिध्देश्वर वाले, अण्णासाहेब कोतली, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय सुत्रावे, उपप्राचार्य एम. बी. पाटील उपस्थित होते.

डॉ. दामा म्हणाले, प्राध्यापकांना सीड मनी, विद्यार्थ्यांना एन. सी. सी वगैरे सुविधा देण्याचा प्रयत्न येत्या नवीन वर्षात विद्यापीठ करीत आहे. शिवदारे महाविद्यालय हे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट महाविद्यालय असून या महाविद्यालयाशी जुने नाते असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी शिवदारे यांनी, सर्व पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या पारितोषिक वितरण समारंभात ६ प्राध्यापक व १९२ विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. तसेच प्रांजल पवार या विद्यार्थिनीस व्ही. जी. एस. स्टार हा किताब देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात विजयालक्ष्मी जेऊरगी या विद्यार्थिनीने गायलेल्या स्वागतगीताने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुत्रावे यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर केला. प्रमुख अतिथींचा परिचय प्रा. डॉ. अनमोल वळसंगे यांनी करून दिला. पुरस्कारांचे यादी वाचन समन्वयक प्रा. एम. बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शुभदा उपासे-शिवपुजे व प्रा. हरिप्रिया यांनी केले तर आभार डॉ. ऋषीकेश धनवे यांनी मानले.

याप्रसंगी सुभाष मुनाळे, पशुपती माशाळ, प्रमोद बिराजदार, भीमाशंकर म्हेत्रे, चंद्रकांत गुरव, सिध्दाराम हेळकर, डॉ. बी. एन.कांबळे, डॉ. आर. वाय. पाटील, डॉ. कापसे, प्राचार्या श्रुती गायकवाड, अंजली तिवारी, मुख्याध्यापक पूजा बाजपेयी उपस्थित होते.